# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६
ई-मेल: mercindia@merc.gov.in
संकेत-स्थळः www.mercindia.org.in/www.merc.gov.in

## जाहीर नोटीस

**सन २०१९ चे प्रकरण क्र. १०८**

**जाहिरात क्र. --- /२०१९-२०**

**महाराष्ट्र राज्याच्या पवन ऊर्जा परिमंडलाच्या वर्गीकरणाच्या आढाव्यासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणाने सादर केलेल्या अहवालावर अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती मागविण्याबाबत**

१. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेडने (महावितरण कंपनी) सातत्याने उच्चतम ऊर्जा निर्मिती करणाऱ्या प्रकल्पांच्या पवन ऊर्जा परिमंडलामध्ये पुनरीक्षण करण्याची मागणी करताना आयोगाने सन २०१७ च्या प्रकरण क्र. ४१ मध्ये दिनांक ३ एप्रिल, २०१८ रोजी दिलेल्या आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी सन २०१८ च्या प्रकरण क्र. १५२ अंतर्गत याचिका दाखल केली होती.

२. आयोगाने, सन २०१८ च्या प्रकरण क्र. १५२ मध्ये दिनांक ९ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या आदेशान्वये सदर पुनर्विलोकनास परवानगी दिली आणि महावितरण कंपनी/ऊर्जा निर्मात्यांनी सादर केलेल्या प्रत्यक्ष ऊर्जा निर्मितीच्या आकडेवारीच्या आधारावर आर्थिक वर्ष २०१८-१९ च्या अखेरीस पवन ऊर्जा प्रकल्पांच्या पवन ऊर्जा परिमंडलाच्या वर्गीकरणाचा आढावा घेण्याचे निर्देश महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणास (महाऊर्जा) दिले.

३. त्यानुसार, महाऊर्जाने दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ रोजी आयोगास अहवाल सादर केला. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कामकाज प्रचालन) विनियम, २००४ अंतर्गत आवश्यक असल्यानुसार, सदर अहवाल महावितरण कंपनीकडे त्यांच्या अभिप्रायासाठी पाठविण्यात आला. महावितरण कंपनीने दिनांक २२ एप्रिल, २०१९ रोजी त्यांचा अभिप्राय सादर केला.

४. आता, सन २०१८ च्या प्रकरण क्र. १५२ मध्ये दिनांक ९ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने, आयोगास महाऊर्जाने सादर केलेला अहवाल आणि त्यावरील महावितरण कंपनीचा अभिप्राय याबाबत जनतेशी सल्लामसलत करण्याची प्रक्रिया हाती घेणे योग्य वाटते.

५. त्यानुसार, महाऊर्जाने सादर केलेल्या अहवालावर आणि त्यावरील महावितरण कंपनीच्या अभिप्रायावर आयोग जनतेकडून अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती लेखी मागवित असून त्या सहा (१ + ५) प्रतींमध्ये आयोगाचे सचिव यांना, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा

मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई–४०००५ येथे व्यक्तिशः किंवा पोस्टाने किंवा फॅक्स किंवा ई-मेल[फॅक्सः०२२-२२१६३९७६ ई-मेलः mercindia@merc.gov.in] द्वारा या पत्त्यावर **शुक्रवार, दिनांक ३१ मे, २०१९** रोजी किंवा त्यापूर्वी मिळतील अशा रीतीने पाठवाव्यात.

६. ज्या व्यक्तिंना अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती पाठवायच्या असतील त्यांनी त्यामध्ये पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि, असल्यास, ई-मेलचा उल्लेख करावा. हरकती कोणत्याही संस्थेच्या किंवा ग्राहक वर्गवारीच्या वतीने पाठविण्यात येत असतील तर तसे त्यात नमूद करण्यात यावे. तसेच सूचना व हरकती पाठविणाऱ्या व्यक्तिस आपले म्हणणे व्यक्तिशः मांडावयाचे असेल तर ते देखील त्यामध्ये नमूद करण्यात यावे, म्हणजे अशा व्यक्तीला, आयोगाकडून, शुक्रवार, **दिनांक ७ जून, २०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता, आयोगाच्या १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई, ४०० ००५** या पत्त्यावरील कार्यालयात आयोजित करण्यात येणाऱ्या जाहीर सुनावणींच्या वेळी त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येईल. यासाठी कोणतीही वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

७. **शुक्रवार, दिनांक ३१ मे, २०१९** रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त झालेले सर्व अभिप्राय, सूचना आणि/ किंवा हरकती आयोगाकडून आदेशास अंतिम स्वरुप देण्यापूर्वी विचारात घेण्यात येतील.

दिनांक : ९ मे, २०१९

ठिकाण : मुंबई, सचिव, मविनिआ